## १९७१ पासून चाऊस कुटूंबाचा माजलगाव नगर पालिकेत दबदबा

# तीन वेळा नगराध्यक्ष, १२ वेळा उपनगराध्यक्ष

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

**माजलगाव, (दिव्य न्युज):- आमदार प्रकाशदादा सोळंके काय चीज आहेत, याची कल्पना संपूर्ण महाराष्ट्राला आहे. ते एखाद्याच्या मागे लागले की समोरच्याची साडेसाती सुरू झाली, असे माजलगावचे लोक बोलतात. अशावेळी पद आणि सत्तेचा ते पुरेपूर वापर करतात. त्यामुळे बहुतांश विरोधक कुठे न कुठे त्यांच्याशी हात मिळवणी करतात. नगर पालिका निवडणुकीत ऑब्जेक्शन दाखल करण्याच्या दिवशी आमदार सोळंके स्वतः माजलगाव तहसीलमध्ये ठाण मांडून बसले होते.**

कसंही करून तुतारी गटाच्या उमेदवार शिफा बिलाल चाऊस यांचा उमेदवारी अर्ज बाद करणे, यासाठी त्यांनी आपली सगळी शक्ती पणाला लावली. पण तरीही शिफा चाऊस यांचा अर्ज बाद झालाच नाही. उलट त्यांनी प्रकाशदादा सोळंके यांच्या उमेदवार मेहरून पटेल यांचा ३,५२९ मतांनी दणदणीत पराभव केला. त्या तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या. शिफा बिलाल चाऊस यांचा खरा सामना संध्याङ्गमेंडके यांच्याशी झाला. पटेल यांना ८,७२७ तर मेंडके यांना ९,६३३ मते मिळाली. विजयी उमेदवार शिफा चाऊस यांना १२,२५६ मते मिळाली. चाऊस यांनी आपला विजय इतका सोपा कसा केला? १९७१ पासून त्यांनी पालिकेवर आपलं वर्चस्व कसं राखलं याच चर्चा सध्या माजलगावात सुरू आहेत. माजलगाव नगर पालिकेच्या राजकारणात चाऊस फॅमीलीचा मोठा दबदबा आहे. शहरांतील मुस्लिम मतदारांची सर्वाधिक संख्या असो, नाहीतर चाऊस यांचे हिंदूंसोबतची रोजची उठबस असो. दिन, दलीत १८ पगड जाती, धर्मासोबत चाऊस यांचे सलोख्याचे संबंध आहेत. त्यामुळे माजलगावचे नागरिक त्यांच्याकडे मुस्लिम म्हणून पाहत नाहीत. त्यामुळेच चाऊस हे माजलगावातून कुठल्याही प्रभागातून निवडून येण्याची ताकद ठेवून आहेत.ङ्गङ्गसहाल चाऊस यांचे वडील अमेर चाऊस हे १९७१ ते १९८६ असे १५ वर्षे नगरसेवक राहीले आहेत. स्वतः सहाल चाऊस १९८६ ते २०१६ इतकी वर्ष नगरसेवक राहीले. त्यात १९९७ साली ते पहिल्यांदा उपनगराध्यक्ष झाले. त्यानंतर तब्बल १२ वेळा त्यांना उपनगरध्यक्षपदाची संधी मिळाली. २००६ साली त्यांच्या पत्नी पोटनिवडणुकीत अपक्ष नगराध्यक्षा झाल्या. तर २०१६ साली ते भाजपा पुरस्कृत जनतेतून नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. म्हणजेच माजलगावच्या नगर पालिकेत इतक्या प्रदीर्घ काळापासून चाऊस कुटुंबाची सत्ता आहे. मात्र २०२० साली आमदार सोळंके यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या

▶▶ पान २ वर



### आ. सोळंकेंना तिसरा नंबर कसा ?

तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या महेरुन पटेल ह्या शेवटपर्यंत कुठल्याच स्टेजवर दिसल्या नाहीत. त्यामुळे उमेदवाराची ओळखच झाली नाही. खलील पटेल यांच्याकडेही चाऊस, मेंडके यांच्याप्रमाणे मत खेचून घेण्याची लोकप्रियता नव्हती. पटेल यांना जे मतदान मिळाले ते आमदार प्रकाशदादा सोळंके यांचं योगदान आहे. सोळंके यांनी पटेल यांच्या मागे मोठी ताकद लावली. नगरसेवक पदाला उभ्या असलेल्या उमेदवारांनाही प्रचंड रसद पुरवली.

पान २ वर

---

## इरादो मे दम है तो मंजिले भी झुका करती है

# अशक्य ते शक्य करणारे प्रत्येकांच्या सुख दुःखात नेहमी पुढे असणारे सफवान खानचा आज वाढदिवस

### युवकांच्या मनातला राजा, राजा सारखं मन



**बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील एसएमके ग्रुपचे फाउंडर युवकांच्या मनावर अधिराज्य करणारे, ज्याचे मन राजा सारखं आहे. युवकांच्या मनात नेहमी राज कारणाऱ्या या राजकर्त्यांचा आज वाढदिवस.... आजच्या या घडीला त्यांना प्रथम खुप खूप शुभेच्छा... त्यांचे पुढील आयुष्य चांगलेआनंदाचे भरभराटीचे आणि उंचीच्या शिखरावर घेवून जाणारे ठरावे हीच अल्लाहकडे दुवाँ/ प्रार्थना.... वडीलाच्या पाऊलावर पाऊल ठेवून समाज कार्यात अग्रेसर असलेले सफवान खान हाजी महेबुब खान हे नाव संपूर्ण जिल्ह्यात परिचित आहे. नेहमी गोर गरीब, दिन -दलित अठरा पगड जातीच्या गोर गरीबांना न्याय देण्यासाठी नेहमी हात पुढे ठेवून मदत करणाऱ्या या युवकांचा आज वाढदिवस....**

एका शायरनी म्हंटले आहे की, इरादों मे दम है ते मंजिले भी झुका करती हे म्हणजे माणसाच्या हदयात त्यांनी ठरविलेले एखादे काम पक्के असेल तर त्याला पुढे कोणतीच अडचण निर्माण होत नाही. म्हणजे कितीही उंच इमारत असो ते झुकल्याशिवाय राहत नाही. वडील हाजी महेबुब खान हे प्रसिध्द समाजसेवक, आपल्या सामाजिक क्षेत्रात त्यांनी अमृल्य कामगिरी केली आहे. कोणीही असो महेबूब खान यांचा हात नेहमी देण्यासाठी पुढे असतो. हेच लक्षात ठेवून सफवान खान यानीही आपले काम सुरू ठेवले आहे. युवकांची मोठा फोजफाटा सोबतीला.... प्रत्येक युवकांच्या मनात अधिराज्य गाजविणारे सफवान खान यांचे नाव आहे. कोणत्याही जाती धर्माचे असो प्रत्येकांच्या सुख दुःखात, सन उत्सवात सामील होवून त्यांचा आनंद आणि दुःखात सहभागी राहिलेले आहेत. म्हणून त्यांची आज युवकांच्या मनात प्रचित आहे. आपल्या सामाजिक कार्यात त्यांनी आतापर्यंत अनेकांना खुल्या हातानी मदत केली आहे. मनात कोणाच्याही विषयी भेदभाव न बाळगता सर्वंसाठी अर्ध्यारात्री धावून जाणारा हा युवक. आपण मदत करतो ती फक्त आणि फक्त अल्लाहसाठी... कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रत्येकाच्या सुख दुखात सामील होणाऱ्या या युवकाला वाढदिवसानिमित्त कश्मकश, दिव्य वार्ता परिवारातर्फे हार्दिक हार्दिक शुभेच्छा....!

---

# छत्रपती मल्टीस्टेटच्या भंडारीमुळे बीडच्या पिग्मी एजंटवर घर सोडून जाण्याची वेळ

## दोन दिवसांपासून बेपत्ता; कुटुंबियांची पोलिसात तक्रार



बीड (दिव्य न्युज):- छत्रपती मल्टीस्टेटचे चेअरमन संतोष भंडारी याच्यामुळे अनेक ठेवीदारांचे कुटूंब उघड्यावर आले आहेत. ठेवी परत मिळत नसल्याने अनेक ठेवीदारांनी पोलीसांत तक्रार दिलेली असुन या प्रकरणात गुन्हे देखील झालेले आहेत. याच संतोष भंडारीमुळे आता पिग्मी एजंटावर घर सोडून जाण्याची वेळ आल्याचा प्रकार समोर आला आहे. पिग्मीमध्ये भरलेले पैसे भंडारी देत नसल्यामुळे लोकं मला परेशान करत असल्याने मी घर सोडून जात असल्याचा व्हिडीओ कुटूंबियांना शेअर करत बीडमधील पिग्मी एजंट जावेद खान हे बेपत्ता झाल्याची तक्रार कुटूंबियांनी बीड शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

बीड शहरातील आसेफ नगर भागातील रहिवाशी जावेद खान हे गेल्या सात वर्षांपासून छत्रपती मल्टीस्टेट बँक बीड येथे पिग्मी एजंट म्हणून काम करत आहेत. दि.२२ डिसेंबर २०२५ पासून ते बेपत्ता आहेत.

▶▶ पान २ वर

---



प्रभाग क्रं १७ मधील मतदारांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत. ज्या बहादुर मतदारांनी माझ्या सारख्या एका सामान्य कुटूंबातील युवकावर विश्वास ठेवून मला प्रचंड मतांनी विजय प्राप्त करून दिला. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच पक्षाचे सर्व नेते मंडळींचाही मी आभारी आहे. ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवत मला उमेदवारी दिली. या निवडणुकीच्या काळात मला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्व मित्र परिवार, शुभचिंतक हितचिंतक, मतदार, नातेवाईक यांचे

**मन:पुर्वक आभार**

**शेख बिलाल**
नवनिर्वाचित नगरसेवक
प्रभाग क्रं.१७

---



**प्रभाग क्रं २० मधील सर्व मतदारांचे व जनतेच्या आशिर्वादाने अन् मिळालेल्या या विजयातून प्रभागाच्या सर्वांगिण विकासाठी मी सदैव कटीबध्द राहिन. जिंकलेले मत हे माझ्यासाठी आकडेवारी नाही ती तुमच्या विश्वासाचा, प्रेमाचा आणि साथीचा पुरावा आहे.या विजयासोबत माझ्यावर मोठी जबाबदारी आली आहे ती मी अत्यंत प्रामाणिकपणे निभावणार या निवडणूकीत मला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्व हितचिंतक,शुभचिंतक, मित्र परिवार यांचे**

**जाहिर आभार!**

**- सय्यद इलियास हमीद**
नगरसेवक न.प.बीड (प्र.क्र.२०)

---



**प्रभाग क्रं १६ मधील मतदारांचे जाहिर आभार त्यांनी स्व.शेख शहबाज यांची नगरसेवक होण्याची इच्छा मतदारांनी त्यांच्या पत्नीला या प्रभागातून विजयी करून पूर्ण करून दिली. प्रभागातील मतदारांनी आमच्यावर टाकलेला हा विश्वासाला तडा जावून देणार नाही. प्रभागाच्या सर्वांगिण विकासासाठी भरपुर प्रयत्न करण्यात येतील. या प्रभागातील सर्व समस्या येणाऱ्या काही दिवसात निकाली काढल्याचे मतदारांना दिसून येईल. पुन्हा एकदा मतदारांचे आणि आम्हाला या निवडणूकीत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या मित्र परिवार, हितचिंतक, शुभचिंतक, सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून**

**जाहिर आभार!**

**-शेख जमील**
नगरसेवक (प्र.क्रं.१६)

# बीड नगरपरिषद निवडणूकीत आ.संदीप क्षीरसागर यांच्या पराभवामागची नेमकी कारणे कोणती?

बीडच्या नगरपरिषद निवडणुकीत सुरुवातीला आ. संदीप क्षीरसागर यांची स्थिती मजबूत मानली जात होती. मराठा-मुस्लिम-बौद्ध असे सामाजिक समीकरण उभं केल्यामुळे ही निवडणूक त्यांच्या बाजूने झुकलेली असल्याचं चित्र होतं. मात्र निकालाने वेगळंच वास्तव समोर आणलं.

### या पराभवामागे काही कारणे दिसून येतात

१) मुस्लिम मतदारांमधील संभ्रम- या निवडणुकीत मुस्लिम मतदार हे निर्णायक ठरले. मात्र अजित पवार गट आणि शरद पवार गट - अशा दोन्ही राष्ट्रवादींमुळे मुस्लिम मतांमध्ये फूट पडली. काही मुस्लिम मतदार आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे राहिले, पण मोठा वर्ग अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे वळला. अपेक्षित एकगठ्ठा मुस्लिम मतांचा लाभ आ.संदीप क्षीरसागर यांना मिळाला नाही.

२) मराठा समाजाचा पाठिंबा शेवटपर्यंत टिकला नाही- विजयसिंह पंडित यांनी निवडणुकी दरम्यान शेवटच्या टप्प्यामध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांची भेट घेतल्यानंतर शहरातील मराठा मतदारांमध्येही संभ्रम निर्माण झाला. याचा थेट फटका आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाला बसला. मराठा समाजाचा एक मोठा वर्ग शेवटच्या टप्प्यात त्यांच्या सोबत राहिला नाही, अशी चर्चा आहे.

३) अनेक आघाड्यांवर एकाच वेळी लढाई- संदीप क्षीरसागर यांना एकाच वेळी भाजप, अजित पवारांची राष्ट्रवादी आणि अंतर्गत राजकीय समीकरणांशी सामना करावा लागला. ही निवडणूक फक्त पक्षीय नव्हे, तर बहुपदरी राजकीय लढत ठरली. आ.विजयराजे पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवारांच्या बीडमध्ये मोठ्या दोन सभा घेतल्या तर डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची मोठी सभा घेतली. यासोबतच मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी डॉ. योगेश क्षीरसागर यांची कमान सांभाळली. एकीकडे दोन्ही बाजूनी दिग्गजांचा सभा आणि प्रचार दौरे तर दुसरीकडे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या बाजूने कोणतेही राज्य लेवलचे नेते पक्षाचे ज्येष्ठ नेते यांची कुठलीही सभा घेण्यात आली नाही. एकटेच या सगळ्या आघाड्यांवर तोंड देत होते.

४) भाजपचे 'मुस्लिमांशिवाय इतर' हे समीकरण- डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भाजप प्रवेशानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना पुढे करत शहरात वेगळं सामाजिक समीकरण उभं केलं. मुस्लिम मतांशिवाय इतर समाजांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे मतांचं ध्रुवीकरण बदललं.

५)सामाजिक गणित असलं तरी निवडणुकीतील व्यवस्थापन कमी पडलं?- २२ मुस्लिम उमेदवार, बौद्ध समाजाचा पाठिंबा, मराठा हे सगळं असूनही प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी हे गणित मतपेटीत पूर्णपणे उतरलं नाही. यामुळे संघटनात्मक ताकद आणि शेवटच्या टप्प्यातील निवडणूक व्यवस्थापनाबाबत प्रश्न उपस्थित होतात.

बीडच्या नगरपरिषद निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांचा पराभव हा एका कारणामुळे नव्हे, तर....मुस्लिम मतांमधील फूट, मराठा समाजाचा अपुरा पाठिंबा, अनेक राजकीय आघाड्यांवरील, एकत्रित संघर्ष आणि शेवटच्या टप्प्यातील रणनीतीतील त्रुटी.....या सगळ्यांचा एकत्रित परिणाम ठरला.



# अखलाकप्रकरणी याचिका नामंजूर

## आरोपींवरील गुन्हे मागे घेण्याची केली होती विनंती

लखनऊ, (वृत्तसेवा):- मोहम्मद अखलाक झुंडबळीप्रकरणी उत्तर प्रदेश सरकारने दाखल केलेली याचिका गौतम बुद्धनगर येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालयाने मंगळवारी फेटाळली. या झुंडबळी प्रकरणातील जीवित आरोपीविरोधातील गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी विनंती राज्य सरकारने केली होती. परंतु न्यायालयाने ती नामंजूर केली. उलटपक्षी, या खटल्याची दैनंदिन सुनावणी करावी व साक्षीदारांना निर्देशही न्यायालयाने दिले. सुरक्षा द्यावी, असे या मागे घेण्यात यावेत यासाठी राज्य सरकारने १५ ऑक्टोबर रोजी याचिका केली होती. अखलाक यांच्या पत्नीने सरकारच्या या याचिकेस आव्हान दिले होते. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश सौरभ द्विवेदी यांच्या जलदगती न्यायालयासमोर या याचिकेची सुनावणी झाली. फौजदारी कारवाई संहितेच्या कलम ३२१ अनुसार आरोपींवरील खटले मागे घ्यावेत, अशी विनंती सरकारी वकिलांनी केली. या कलमानुसार, एखाद्या आरोपीविरोधातील खटला मागे घेण्याची सरकारी वकिलाची विनंती कायद्याच्या दृष्टीने योग्य वाटल्यास तसा निर्णय घेण्याचा अधिकार न्यायालयास असतो. मात्र, न्यायालयाने ही विनंती फेटाळली व ६ जानेवारी रोजी या खटल्याची पुढील सुनावणी ठेवली.आरोपींवरील फौजदारी खटले या झुंडवळीप्रकरणी एकूण १८ जणांना अटक करण्यात आली होती. यामध्ये तीन अल्पवयीन आरोपींचा समावेश आहे. तर, एका आरोपीचे कालांतराने निधन झाले. उर्वरित १४ आरोपी सध्या जामिनावर बाहेर असून, त्यांच्यावरील कायदेशीर कारवाई व दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची विनंती राज्य सरकारने केली होती.



**'मकोका लावता येत नाही, देशमुखांच्या हत्येशी संबंध नाही...'**

# दोष मुक्तीसाठी वाल्मीक कराडचा खंडपीठात अर्ज

बीड , (दिव्य न्युज):- बहुचर्चित संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडने औरंगाबाद खंडपीठात दोषमुक्तीसाठी अर्ज सादर केला आहे. या याचिकेवर सुनावणी घेत खंडपीठाने पुढील सुनावणी १५ जानेवारी रोजी ठेवली आहे.

मस्साजोग (जि. बीड) येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड यानें औरंगाबाद खंडपीठात दोषमुक्त करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. आपल्यावर मकोका लावता येत नाही, देशमुख यांच्या हत्येशी माझा संबंध नाही, 'मकोका' लावण्यासाठी मागील दहा वर्षांत गुन्हे दाखल नाहीत आणि संघटीत गुन्हेगारीचा सदस्य नसल्याच्या मुद्द्यावर कराडने दोषमुक्ती अर्ज सादर केला.या अर्जावर मंगळवारी खंडपीठात न्या. संदीपकुमार मोरे आणि न्या. वाय. जी. खोब्रागडे यांच्यासमोर सुनावणी झाली. आरोपीचे वकील उपस्थित नसल्याने खंडपीठाने पुढील सुनावणी १५ जानेवारी रोजी ठेवली आहे. बचाव पक्षाच्या वतीने ॲड. झेड. एच. फारुकी आणि ॲड. धनंजय पाटील यांनी काम पाहिले.

पान ४ वरून

## सर्वसामान्यांची आडवणुक

गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ ही कामे पूर्ण करण्यात यावेत. नागरिकांना केशरी कार्ड व पिवळे कार्ड यांना प्रति मानसी मिळणारे धान्य याबाबत सुसूत्रता येण्यासाठी आलेला कोटा व वाटप झालेला कोटा यामधील तफावत दूर करावी. तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात वनविभागाचे क्षेत्र असल्याने बिबट्याचा मोठ्या प्रमाणात वावर आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण आहे, याकरिता शेतकरी व नागरिकांना सतर्क राहण्याकरिता जनजागृती करणे आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना दिल्या. नागरिकांच्या जन्म मृत्यू प्रमाणपत्र बाबत अधिकचे कागदपत्र व पुरावे सादर करण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. त्याबाबतीत योग्य निर्णय व्हावा. शहरात विविध खाजगी क्लासेस, शासकीय व खाजगी शाळा कॉलेज यामध्ये शिक्षण घेणाऱ्या किशोरवयीन मुली यांना उनाड मुलांकडून त्रास होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामध्ये योग्य कार्यवाही करावी. मुलींच्या संरक्षणासाठी समिती बनवून यावरती कार्यवाही व्हावी. असे पोलीस यंत्रणेस सांगितले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी श्रीमती वसिमा शेख मॅडम, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, नायब तहसिलदार मोरे. महावितरणचे कार्यकारी अभियंता डोंगरे सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टीचे कार्यकारी अभियंता पानसंबळ, नगराध्यक्ष राजेंद्र जाधव,बांगर मुख्याधिकारी जोशी, पोलिस निरीक्षक, वनपरीक्षेत्र अधिकारी काकडे (वन्य जीव नायगाव मयूर),, गटविकास अधिकारी सानप कृषी अधिकारी शेळके, उपभियंता उदमले साहेब, उप अभियंता राख (जलसंपदा व मृदा जलसंधारण), विस्तार अधिकारी नेटके, तालुका वैद्यकीय अधिकारी, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी, गटशिक्षणाधिकारी गव्हाणे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी बेल्हेकर मॅडम तसेच सर्व विभागांचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, संगणक ऑपरेटर व डेटा एंट्री ऑपरेटर उपस्थित होते.

## जिंतूर नगर परिषदेच्या

केली त्यानुसार मुख्याधिकाऱ्यांनी लावलेले सील उघडण्यात सुरुवात केली.स्थानिक स्वराज्य संस्थेत विविध प्रकारच्या करा पासून कारभार चालविला जातो परंतु नागरिक कर भरण्यास उत्सुक नसल्यामुळे

अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात येलदरी पासून जिंतूरला पाणीपुरवठा करणाऱ्या विद्युत पंप साठी लाखो रुपयांचे विद्यूत बिल थकबाकी असल्यामुळे विविध करांची वसुली करणे गरजेचेच आहे म्हणून नागरिकांनी थकबाकी असलेले पाणी पट्टी, घरपट्टी, दुकान भाडे हा कर वेळेवर भरणा करावा असे जिंतूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्रातील भाजपचे १ मंत्री आणि २ आमदारांविरूद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट जारी

मुंबई, (दिव्य न्युज):- कोरोना कालावधीत करण्यात आलेल्या आंदोलनाप्रकरणी भाजपच्या बड्या नेत्यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. कुडाळ न्यायालयाने राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे, आमदार प्रवीण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांच्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट (छेप-इरळश्ररलश्रश थरीीरपीं) जारी केले आहे. वारंवार न्यायालयाच्या तारखेला अनुपस्थित राहिल्याने न्यायालयाने ही कडक कारवाई केली आहे.



२६ जून २०२१ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून 'संविधान बचाव' आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनादरम्यान कोरोना नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कुडाळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात नितेश राणे, निलेश राणे, राजन तेली यांच्यासह एकूण ४२ जणांवर गुन्हे नोंदवण्यात आले होते.

या खटल्याची सुनावणी आज कुडाळ न्यायालयात पार पडली. यावेळी आमदार निलेश राणे आणि राजन तेली यांच्यासह इतर आरोपी न्यायालयात उपस्थित होते. मात्र, मंत्री नितेश राणे यांच्यासह अन्य पाच जण गैरहजर राहिले. नितेश राणे हे मागील अनेक तारखांना न्यायालयासमोर उपस्थित राहिले नाहीत. आजच्या सुनावणीवेळी राणे यांच्या वकिलांनी गैरहजेरीबाबत दिलेला विनंती अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला. लोकप्रतिनिधी असूनही न्यायालयाच्या कामकाजात सहकार्य न केल्याने संताप व्यक्त करत न्यायालयाने तिन्ही नेत्यांविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट बजावले आहे.अजामीनपात्र अटक वॉरंट जारी झाल्यामुळे या नेत्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. आता त्यांना न्यायालयात स्वतः हजर होऊन हे वॉरंट रद्द करून घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. अन्यथा, तांत्रिकदृष्ट्या पोलिसांना त्यांना ताब्यात घेण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. या निर्णयामुळे आता संबंधित नेत्यांना न्यायालयात हजर होऊन जामीन मिळवावा लागणार आहे, अन्यथा अटकेची टांगती तलवार त्यांच्यावर कायम राहणार आहे.

पान १ वरून

## तीन वेळा

तक्रारीवरून त्यांना सहा महिने जेलमध्ये काढावे लागले. त्यामुळे नगराध्यक्षपदावरून चाऊस यांना जिल्हाधिकाऱ्यांनी बडतर्फ केलं होतं. यावेळच्या प्रचाराचा मुद्दा देखील चाऊस यांनी केलेल्या भ्रष्टाचाराचा राहीला. त्यांच्याविरोधात अनेक एआय व्हिडिओ आले. ज्यातून त्यांचा प्रचंड हसी मजाक उडवला गेला. पण तरीही माजलगावच्या नागरिकांनी शिफा बिलाल चाऊस यांना विजयी केलं.ङ्गङ्गत्यांच्या विजयात वर सांगितलेली काही कारणं आहेत. पण त्याशिवाय त्यांचं कुटुंबातील प्रत्येक सदस्य माजलगावच्या नागरिकांसाठी काम करतो. चाऊस जेव्हा जेव्हा नगर पालिकेत निवडून जातात तेव्हा तेव्हा ते-माजलगावच्या स्वच्छतेसाठी आग्रही असतात. पहाटे पाचपासून ते माजलगावच्या नागरिकांना सफाई कर्मचाऱ्यांना सुचना देत असताना रस्त्यावर दिसतात. पाणी प्रश्नाच्या बाबतीत देखील ते काळजी घेतात. माजलगावची कुठली पाईपलाईन कुणीकडे गेली, कुठल्या पाईपलाईनवर लोड येईल, रस्त्याची खाली असलेली कुठली पाईपलाईन फुटली असेल याचा अचूक अंदाज त्यांना असतो. सांगायचं हे की माजलगावच्या प्रत्येक गोष्ट त्यांच्या निगराणीत झालेली असल्यानं त्यावरचा उपाय देखील त्यांना माहिती असतो. हिंदू धर्माचा कुठलाही सण-समारंभ असो, त्या दिवशी त्या परिसराची स्वच्छता करण्याचं काम चाऊस नगर पालिकेकडून करवून घेतात.. या उत्सवात ते सहभागी होतात. त्यामुळे भाजपासारखा कट्टर हिंदूत्ववादी पक्ष समोरून असतानाही चाऊस यांनी हिंदू बहुल भागातून मोठी मतं मिळवली आहेत.ङ्गङ्गशहरात कोणत्याही महापुरूषांची जयंतीउत्सव असो, प्रत्येक कार्यक्रमात त्यांची उपस्थिती असणार. त्यामुळे कुठलाच समाज, जात, धर्म त्यांना कोण्या एका जातीचं लेबल लावू शकत नाही, ही त्यांची खरी खासियत आहे.ङ्गङ्गसहाल चाऊस हाताचा पंजा निशाणीवर लढले, शिवसेना बाळासाहेब ठाकरेंच्या धनुष्य बाणाकडून लढले, घडीच्या चिन्हावर देखील त्यांनी निवडणुका लढल्या, अपक्ष लढले, आणि आता तुतारीच्या चिन्हावर देखील ते लढले. प्रत्येक निवडणुकीत ते जिंकलेच आहेत. यावरून त्यांची लोकप्रियता लक्षात येते. शिवाय मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे, नारायणराव डाक यांच्यासारख्या नेत्यांनी चाऊस यांना राजकारण म्हणून नव्हे तर मित्र म्हणून मदत केली. त्यांच्या विजयात त्यांचा सिंहाचा वाटा राहीला.

## आ. सोळंकेंना तिसरा

पण मतदारांनी खाली घडी आणि वर तुतारी, किंवा कमळ मारल्याचं दिसून आलंय. एक तर आमदार सोळंके ज्या विकासाची अश्वासनं देत होते ती विकासकामे त्यांना आमदार म्हणूनही करता येतात, हे लोकांच्या मनात होतं. आणि दुसरं म्हणजे प्रशासकाच्या काळात त्यांनी काय केलं? हे माजलगावच्या जनतेसमोर होतं. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी देखील माजलगावात प्रचार सभा घेतली. पण अजितदादांनी इतक्या दिवस इथल्या लोकप्रतिनिधींनी काय केल? असाच सवाल केला. त्यामुळे लोक आमदार सोळंके यांच्याकडेच बोट दाखवू लागले होते. त्यामुळे प्रकाशदादांच्या उमेदवाराला माजलगावात दुसरा क्रमांक देखील मिळू शकला नाही, असं दिसून येतं.

## छत्रपती मल्टीस्टेटच्या

घरात कोणालाही काही एक न सांगता ते घरातून निघून गेले आहेत. कुटूंबियांनी सर्वत्र शोध घेतला मात्र ते मिळून आले नाहीत. त्यानंतर जावेद खान यांनी आपल्या कुटूंबियांच्या व्हॉट्सॲपवर व्हिडीओ पाठवला आहे. पिग्मीचे भरलेले लोकांचे पैसे नाना भंडारी हे देत नसल्यामुळे लोकं मला परेशान करत आहेत. त्यामुळे मी घर सोडून जात असल्याचे त्या व्हिडीओमध्ये म्हटले आहे. त्यानंतर मात्र जावेद खान यांचा फोन बंद आहे अशी तक्रार कुटूंबियांनी बीड शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. या प्रकरणी शहर ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद घेण्यात आली आहे.